म. ग्रं. सं. ठाणें

षय काव्य.

. क्र. २१९३

ा. ८

...णें

सन
१८५५

विषय
का/०२१

प्रधान

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव देवसेनी

REFBK-0020169

REFBK-0020169

सं-काव्य
१८६

दा०क्र- २०१६९.

# DAIVASENI

OR

# A STORY OF THE KING OF JAYAPUR

A POEM

BY

BAJABA RAMCHANDRA PRADHAN.

SECOND EDITION

REFBK-0020169
REFBK-0020169

PRINTED AT THE "NIRNAYA-SAGAR" PRESS.

1877.

*Price 4 Annas.*

# दैवसेनी

## जयपूरच्या राजाची गोष्ट

बजाबा रामचंद्र प्रधान

यांनीं रचिली.

आवृत्ति दुसरी.

मुंबईंत

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिली.

सन १८७७ इ०.

किंमत ४ आणे.

१८७९
५६

# प्रस्तावना.

या पुस्तकाची पहिली आवृत्ति सन १८६७ ह्या वर्षीं छापिली त्या वेळच्या सर्व प्रती दोन वर्षांतच संपल्या. हल्लीं दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग आल्यावरून मागील आवृत्तींत कित्येक स्थलीं दोष ह्मणून वाटले ते येथें नीट केले आहेत.

ब० रा० प्र०

मुकाम आकोलें वऱ्हाड.

तारीख १ फेब्रुवारी सन १८७७ इ०.

सं. काव्य
१८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# सूचना.

ह्या कवितेस आधारभूत जो मजकूर घेतला आहे तो उत्तर हिंदुस्थानांतल्या जयपूरचे राजांचे इतिहासांतील आहे. सुमारें दीडशें वर्षांपूर्वीं राजा सवाई जयसेन यास तारुण्यांतच जयपूरची गादी प्राप्त झाली. त्याच्या राज्यांत मालपूरचा ठाकूर यानें दिल्लीचे बादशाह याचे मदतीनें बंड केलें. राजानें त्याचें पारिपत्य करण्यास आपला मुख्य सरदार ठाकूर देवसेन यास पाठविलें. देवसेन जय मिळवून माघारा आला परंतु त्याचेविषयीं राजाच्या मनांत कांहीं कारणानें वैमनस्य उत्पन्न झालें त्यामुळें त्यास जयपूर सोडून पळून जावें लागलें. देवसेनास एक कन्या होती तिला तो बरोबर घेऊन निघाला आणि मैरवाडा प्रांतांतील डोंगरी प्रदेशांत छपून राहिला. आपले सरदारास मैरवाडा प्रांतांतील लोकांनीं आश्रय दिला ह्मणून जयसेन राजास राग आला आणि त्यानें मैर लोकांवर स्वारी करून त्यांचा पराजय केला. तथापि देवसेन राजाच्या हातीं सांपडला नव्हता. नंतर राजा त्या प्रांतांत कांहीं दिवस तळ देऊन

राहिला. त्याला या डोंगरी प्रदेशांतील विचित्र देखावे वारंवार पाहण्यास फारच आवडे. एके दिवशीं राजा शिकारीस गेला असतां त्यास रानांतच संध्याकाळ झाली. यानंतर काय चमत्कार झाला हें पुढील गोष्टींत वर्णिलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. क्र. २०९६८
शाखा (स्थळ प्र

॥ श्री ॥

# दैवसेनी.

॥ श्लोक ॥

चंद्राची बहुरम्य सौम्य सुखद च्छाया दिसों लागते॥
जीतापें श्रमली असे वसुमती विश्रांति ते पावते॥
भानूच्या गमनें सकाम विधु तो आनंदला नेटका॥
क्रीडादंग रिघेन भोंवुधिमधें संगें सख्या तारका ॥ १ ॥

॥ दिंडी ॥

चंद्रकिरणें जल स्वच्छ दीसताहे ॥
तृषा ऐशा मृग भागवी प्रवाहें ॥
निबिड झाडी देखोनि उभा राहे ॥
स्वस्थ निद्रेतें स्थान शोधिताहे ॥ २ ॥

अस्तसमयीं रविकिरण लोपताती ॥
अशा समयीं अवचीत शब्द होती ॥
श्वान सन्निध येतात वाटताती ॥
दूर अश्वाचे पाय वाजताती ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥

दचकला स्वमनीं मृग बापुडा ॥
समय संकटिंचा तरि रोकडा ॥
थरकुनी हृदयीं झणि ऊठला ॥
चकितदृष्टि विलोकित राहिला ॥ ४ ॥

॥ दिंडी ॥

स्वस्थ निर्भय एकांत हरिण होता ॥
कसा दचके भय वाटतांच चित्ता ॥
दीर्घ टाकी निःश्वास काय वाटे ॥
प्राणसंरक्षणभीति मनीं दाटे ॥ ५ ॥

॥ श्लोक ॥

तो धावला हरिण सत्वर वायुवेगें ॥

प्राणांतिचें निकट संकट पाठिमागें ॥
ते श्वान अश्वपतिमागुनि धावताती ॥
शोधावया निबिडकानन कष्टताती ॥ ६ ॥

॥ दिंडी ॥

एकशब्दें भुःकार होति जेव्हां ॥
स्वार तोही करि शृंगनाद तेव्हां ॥
दरीं खोरीं गिरि वृक्षजाल सारीं ॥
तया उत्तर देतात एक सूरीं ॥ ७ ॥
बहुत कुंठित पांथस्थ मार्ग जेथें ॥
उच्चनीचादी आक्रमी स्थलांतें ॥
दाट वल्ली ही उंच तरूमाथे ॥
अंधकारें या व्यापिती स्थलांतें ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥

तें स्थान रम्य बहु शांतवितें श्रमातें ॥
आनंदगीत जणुं पाक्षिमुखेंच गातें ॥

इंदू अशा हरिखला अनुपम्य लाभें ॥
संध्याप्रकाशहि तशांत विशेष शोभे ॥ ९ ॥

विकसितअरविंदाकार मानूं वनाला ॥
गिरिवरशिखरें जीं तींच पत्रें तयाला ॥
जल मधुरमरंदप्राय आहे सरीं तें ॥
भ्रमर विपुलपक्षी गाति गुंजारवातें ॥ १० ॥

हे अद्रिस्थूलदेही अमितगजजसे ठाकलेउंचभागीं॥
पृष्ठींरोमावलीते तरूवर मदही पाझरे नित्य अंगीं॥
शुंडाशृंगाग्रमेघाउचलुनिधरितीमंडलाकारमाला॥
वाटेहीनागपंक्तीसभंवतिअसतीकाननारक्षिण्याला।

ओसाडीशिखरावरीसततदेतेमनाखिन्नता ॥
खालीमात्रबरीवनस्पतिपटें आच्छादिली नग्नता॥
माथातापविलाप्रचंडगिरिचातीव्रांशुनींभास्करें ॥
त्यालागींबहुघर्मत्याससुटलासर्वांगितोपाझरे॥१२॥

आठवी ६०

॥ दिंडी ॥

असें वेष्टित हें स्थान पर्वतांहीं ॥
भूमि आंतिल ही रुंद नसे कांहीं ॥
दरे उंचवटे बहुत ठायिठायीं ॥
निर्झरांचे रमतात ओघ पायीं ॥ १३ ॥

तया ठायीं घनदाटवृक्ष भारी ॥
करिति छाया ते गर्द अंधकारी ॥
सतत शीतलता रम्य तापहारी ॥
श्रांत चित्ता आल्हाद या विहारी ॥ १४ ॥

निवाऱ्याचे ते उंच साग जाती ॥
निंब नांदुरखी रुंद पसरताती ॥
ऐन किंजळ जांबूळ खैर बोरी ॥
त्यांत कंटकसह वेल गच्च भारी ॥ १५ ॥

कुठें पाझरतें उदक पर्वतांगीं ॥
ओघ जाती होऊनि एक संगीं ॥

कड्यावरूनी हे शुभ्र लोटताती ॥
निजानंदीं रंगोनि नाचताती ॥ १६ ॥
कुठें झाडींतुनि लपत ओघ येती ॥
कुठें नेत्रांला स्थीर शांतवीती ॥
कुठें कर्णीं ते मधुर शब्द गाती ॥
कुठें त्रासविती अतुल घोर गीतीं ॥ १७ ॥
दीप्त किंचितशीं उंच पर्वतागें ॥
रक्तवर्णीं तें अंबरार्ध रंगे ॥
गमें आदित्या अस्तमान होतां ॥
कुंकुमानें पूजीत देवकांता ॥ १८ ॥
वरी तेजामृत पाझरीत इंदू ॥
विषयच्छंदीं जो होय सौख्य बंधू ॥
पशू पक्षी साल्हाद होउनीया ॥
गृहीं येती विश्रांति सुखें घ्याया ॥ १९ ॥
अशा समयीं तो हरिण धावताहे ॥

श्वान मार्गेंही स्वार लागलाहे ॥
उच्च उड्डाणें झेंप दूर घेई ॥
उभा राहे पाहोनि दाट राई ॥ २० ॥
हूल धरुनी जे श्वान सर्व येती ॥
सर्व भांबवले अन्यपथें जाती ॥
स्वार बेफाम श्रांत अश्व तो ही ।
व्यर्थ कष्टे शोधोनि दिशा दाही ॥ २१ ॥

॥ साकी ॥

हरिणामागें धांवतधांवत अश्वपती जाताहे ॥
तोंच तयाला मार्गीं कैसें संकट ओढवलें हें ॥ २२ ॥

॥ श्लोक ॥

मार्गीं खंदक रुंदसा दुरुनिया अश्वोत्तमें देखतां ॥
इर्षा ये भरुनी सवेग झडपी तो पार उल्लंघितां ॥
तेजस्वी सुपराक्रमीं नगणती शक्तिप्रमाणाल्पता ॥
सारासारविचारघातकगमेस्वार्थींतयातत्वता ॥ २३ ॥

॥ दिंडी ॥

पैल गेला तों प्राण गलित झाले ॥
अंग खालीं तत्काळ टाकियेलें ॥
स्वार लगबग उतरोनि बंध तोडी ॥
गहिंवरोनी निःश्वास दीर्घ सोडी ॥ २४ ॥

प्राण गेला पाहून तया वेळीं ॥
कंठ दाटे स्वच्छंद अश्रु ढाळी ॥
हात फिरवी बहुवार तया अंगीं ॥
करिति दुःखें कल्होळ अंतरंगीं ॥ २५ ॥

घोरकांतारीं स्तब्ध सर्व वाटे ॥
न पशुपक्ष्यांची हाल दिसे कोठें ॥
चंद्रकांती निवटोनि स्वच्छ वाहे ॥
बहुत झालीशी रात्र वाटताहे ॥ २६ ॥

उठे जाया टाकोनि त्या शवातें ॥
सौख्यदुःखांच्या नित्य सौंगड्यातें ॥
ह्रदय दाटे परतोनि पाहि मागें ॥

धीर धरूनी परि जाय पुढें वेगें ॥ २७ ॥
दिसे उंचवट्यावरुनि वाट गेली ॥
तीच अवघड उतरोनि येत खालीं ॥
भूमि तळवट पाहोनि उभा राहे ॥
पुढें दीपक बहु दूर झळकताहे ॥ २८ ॥
धीर देई स्वमनास पुढें चाले ॥
त्वरित पाठींचें शृंग काढियेलें ॥
हतीं घेउनि तें वाजवीत राही ॥
भरे उल्हासित शब्द दिशादाही ॥ २९ ॥
जाय जवळीं तों संगतप्रवाहें ॥
रुंदपात्रीं जल शांत सांचताहे ॥
गंधवायु स्थिर मंदमंद वाहे ॥
चंद्रकिरणीं आनंद वाहताहे ॥ ३० ॥
सरोवर तें विस्तीर्णसें विराजे ॥
मध्यभागीं त्या द्वीप एक साजे ॥

सभोंतालीं लाहान किती झाडें ॥
उंच ज्यांमाजीं वंश मात्र वाढे ॥ ३१ ॥
शुभ्र कुसुमित जे गुच्छ त्यांत इंदु ॥
प्रीतिनिर्भर ओतीत सुरस बिंदु ॥
शुभ्र कोमलता दृष्टिला विसावा ॥
ललित तोषें सौगंध्य करित जीवा ॥ ३२ ॥
उभा आनंदें राहि उदक कांठीं ॥
द्वीपगुच्छावरि शांतवीत दृष्टी ॥
दोन दपिक तों त्यांत झळकताती ॥
होय शंकित देखूनि नवल चित्तीं ॥ ३३ ॥
वदे कैसें या घोर अशा रानीं ॥
उग्र पशु तो ही भीति जिथें मानी ॥
करी मानव धारिष्ट संचराया
वदूं लटकी तरि दृष्टि कशी वाया ॥ ३४ ॥
परी आणी मग सहज मनीं शंका ॥

क्रूर तस्कर नसतील या स्थलीं का ॥
धरुन असती एकांतसा विसावा ॥
सुरक्षाया अन्यायलब्ध ठेवा ॥ ३ ५ ॥
सौख्य चिंता उल्हास दुःख भीती ॥
धैर्य आशा कल्होळ करिति चित्तीं ॥
शांत ठेवी दृढदृष्टि उभा राहे ॥
तोंच द्वीपांतुनि पवन गिरा वाहे ॥ ३ ६ ॥
“ कोण ताता तें पैल कोण आहे” ॥
अशी वाणी हृदयास विंधिताहे ॥
उंच सुस्वर मंजूळ मनोहारी ॥
प्रेमउत्सुकताभरित मना प्यारी ॥ ३ ७ ॥
वेधियेलें पांथस्थचित्त वाटे ॥
सौख्य संशय आनंद मनीं दाटे ॥
श्वास ओढी झणि भृकुटि उंच लावी ॥
वदन उन्मीलित नवल नेत्र दावी ॥ ३ ८ ॥

काय उद्भवली देवता जलाची ॥
स्वप्न आहे कीं मोहिनी पिशाची ॥
असा शंकित भयभीत चित्त हेरी ॥
पुनः परिसाया शब्द मनोहारी ॥ ३९ ॥
"अहो ताता कीं कोण तुह्मीं आहां ॥
"नाव अणितें क्षण एक उभे राहा" ॥
तोंच नौका जलधार कांपिताहे ॥
सर्प वेगें जलपृष्ठि जसा वाहे ॥ ४० ॥
नाव सुंदर लाहान चपल देही ॥
सतत कामी. परि अल्प भार वाही ॥
त्वरें उदकीं बहु शांत पोहताहे ॥
स्तब्ध उत्सुक पांथस्थ उभा पाहे ॥ ४१ ॥
क्षणें विलया अवकाशपटल जातें ॥
जशी सन्निध ती नाव वळुन येते ॥
तींत गगना उतरोनि काय इंदु ॥

उचंबिळितो पांथस्थत्त्हृदयसिंधु ॥ ४२ ॥
सर्व संशय वा भीति दुःख चिंता ॥
शांत न कशा शमतील ह्मणें आतां ॥
धांव सहसा उदकांत घेत गांठी ॥
नाव लगबग ओढूनि आणि कांठीं ॥ ४३ ॥
नव्हे मानुष गंधर्वकन्यकाहे ॥
वदन उत्सुक सप्रेम शोभताहे ॥
बाल्यचर्या अकलंक फुले देहीं ॥
लाज किंवा संकोच नसे कांहीं ॥ ४४ ॥
पूर्ण दावी स्वच्छंदभाव रीती ॥
सर्वभूतीं अविकल्प दया चित्तीं ॥
स्वच्छ विकसित अरविंद महोदार ॥
चित्त सिंचित आनंदसुधाधार ॥ ४५॥
अर्धी उत्सुक ती तातभेटिलागीं ॥
तोच वाटे कीं होय पैलभागीं ॥

उचंबिळिली अनिवार मनीं आशा ॥
तोय देखुन कीं चंद्रमप्रकाशा ॥ ४६ ॥

महानंदप्रमदांत मग्न जी हे ॥
वदन किंचित उघडोनि हास्य वाहे ॥
पुढें सरसावुनि प्रीतिबळें तोले ॥
सर्व उत्सुकता हेचि रिती बोले ॥ ४७ ॥

॥ साकी ॥

ऐशा सहजाशेनें पाही तों तिज न दिसे तात ॥
एकाएकीं सुकुमारीचा उत्सवविलयाजात ॥४८

॥ दिंडी ॥

तात विरहित पुरुषा न कधीं डोळां ॥
देखियेलें एकांत अशा वेळा ॥
तोच सन्निध दावीत चंद्रछाया ॥
चित्त होई भयभीत त्या पहाया ॥ ४९ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

॥ श्लोक ॥

पुरुष जवळ ऐसा पाहतां हे कुरंगी ॥
दचकुनि भय पावे लज्जिता अंतरंगीं ॥
इतरजन नसे ही संकटीं काय कीजे ॥
वदन करुनि खालीं मौनिनी ते विराजे ॥ ५० ॥

॥ दिंडी ॥

पुरुष पाहुनि ये भीति अंतरंगीं ॥
चित्त सहसा दचकेहि कंप अंगीं ॥
अधोवदनें झांकोनि दृष्टि राहे ॥
कठिण संकट जाणून कष्टताहे ॥ ५१ ॥
धैर्य गेलें मुखचंद्र उतरलाहे ॥
चित्त घाबरलें हृदय उडों पाहे ॥
करी चिंता 'करूं काय अग बाई ॥
धांव ठाकुरजी धांव चंडिकाई' ॥ ५२ ॥
अशी मुद्रा पाहोनि गोरटीची ॥

वीरराणा पांथस्थ वदे वाचीं ॥
"भीरु बाले त्यज भीति दुःख आतां ॥
"होय मानव मीं व्यर्थ तुझी चिंता ॥ ५३ ॥
" पिता प्रियकर पाहीन असा हेतू ॥
"धरुनि आलिस असशील कन्यके तूं ॥
"परी आशा भंगोनि अचंबाही ॥
"व्यर्थ उपजवितो भीति तुझे ठायीं ॥५४॥
"वनीं आलों मृगयेस जाण आजी ॥
"रात्र झाली मज तोंच तयामाजीं ॥
कुठें ठायां शोधितसे विरामा ॥
"तोंच दैवें तव दाखविलें धामा ॥५५॥
"पाहुणा मीं तरि आजि तुझ्या गेहीं ॥
"निराश्रितसा अपरात्र जाहली ही ॥
" जरी तुजशीं आतिथ्य याचियेलें ॥
" कसा करशिल अव्हेर दयाशीले ॥५६॥

॥ श्लोक ॥

लज्जावती उत्तर दे न कांहीं ॥
हाले न तैशी वरतें न पाही ॥
पांथस्थ ऐशांत करी उपाया ॥
नौकेंत तो पाहतसे रिघाया ॥ ५७ ॥

॥ साकी ॥

नौकेमाजीं अग्रस्थानीं दूर परी तो बैसे ॥
योग्यरीतिमर्यादाउत्तमशीलत्यजील कैसें॥ ५८ ॥
सस्मितमुख जयवंत मानुनी उत्कंठित ही भारी॥
चित्तपरीसाशंकपहायाचंद्रमुखीसुकुमारी ॥ ५९ ॥

॥ दिंडी ॥

स्वयें अवलें घेऊनि हर्ता वेगें ॥
नाव हळुहळु लोटीत जळासंगें ॥
भीरु युवती विसरोनि देहभाना॥
स्तब्ध राहे तिज शब्द बोलवेना ॥ ६० ॥

॥ साकी ॥

चालविलें जलयान तयानें चित्त नसे अवधानीं ॥
लक्षनजायअवश्यककामींनसतांतेंस्वस्थानीं॥६१॥
सुविचारांतींपुनरपि चंचल आवरितोस्वमनाला ॥
सदयत्हृदयबहुविनयधरूनीकायवदेसुशिलेला ६२
"बाले सुंदर तरुणी तूं ही मी परपुरुष असें कीं ॥
"ह्मणुनीवदनींमौनतुझ्याहेंचित्तअसेंममशंकी ६३
"व्यर्थ परंतू शंका सारी जाणें तुझी सुशीले ॥
"दूषिलकैशीरीतिजनाचीआतिथ्यादरबोले॥६४॥
"एकाकी ही कुलीनकन्या पांथातें स्वस्थानीं ॥
"सत्कारुनिया आदरितातीं ऐकियलें त्वां कानीं ६५

॥ दिंडी ॥

"जाय जरि ही तव तात इतर कामा ॥
"कुलोचित हें तुज नेइं मला धामा ॥
"तुझा पदरीं उपकार बांधुनीया ॥

"त्वरें जाइन उदईंक निजा ठायां" ॥ ६६ ॥
जणों मानवले बोल कन्यकेतें ॥
करी किंचित आयास बोलण्यातें ॥
पुन्हा लज्जा वदनास करी वाया ॥
अर्धशंकित निर्भीडसें वदाया ॥ ६७ ॥
"अहो" ऐसा जों शब्द बोलताहे ॥
तोंच नौका थडकोनि उभी राहे ॥
मोहपाशीं पांथस्थ गुंतलेला ॥
द्वीप सन्निध न कळेच हें तयाला ॥ ६८ ॥
नाव जेव्हां स्थिर होय हे कुरंगी ॥
भूमिवरतें उतरोनि जाय वेगीं ॥
पाहि ऐसें पांथस्थ चपापोनी ॥
ह्मणे जाइल कीं एकली निघोनी ॥ ६९ ॥
परी पाहे साल्हाद नवल दृष्टीं ॥
कुलिन सात्विक युवतीस उदककांठीं ॥

उभी राहे संकोच निवारोनी ॥
वदे पांथस्था विनय सावरोनी ॥ ७० ॥

“अहो याजी उतरोनि चला गेहां ॥
“रात्र अथवा दिनरात्र सुखें राहा ॥
“परी नाहीं प्रियतात गृहीं आला ॥
“घरीं एकुलती मीहि तया बाला ॥ ७१ ॥

“असो घालविणें योग्य अतिथियाला ॥
“उचित नोहे हें तात कुलिनतेला ॥
“तुह्मा तरि मी निजगेहिं नेत आहें ॥
“परी”—इतुकें बोलोनि उगी राहे ॥ ७२ ॥

मंद किंचित वदनेंदु तिचा पाहे ॥
नेत्र खालीं स्थिर लावुनिया राहे ॥
जणूं उद्भवली काय मनीं शंका ॥
ह्मणुनि आनन ही कष्ट दावितें का ॥ ७३ ॥

२०९६८

॥ साकी ॥

दुःखित शंकित चित्त हिचें कीं नकळे निश्चित कांहीं
काय करावें काय वदावें न सुचे समया हेंही ॥ ७४ ॥

॥ श्लोक ॥

अशी कष्टी वृत्ती स्वचित निजकार्यांस न भली ॥
ह्मणूनी पांथस्थें चतुरतरयुक्ती अवथिली ॥
न पाही तो कांहीं स्वमन जणु भ्रांतींत पडलें ॥
पुढें चाले मार्गें सहजचि जसा पाय उचलें ॥ ७५ ॥

॥ दिंडी ॥

तयामागोनी चकित हंसगामी ॥
जाय नेई पांथास स्वीयधामीं ॥
इंदु गगनीं संपूर्णसौख्यहेतु ॥
वृक्षछायेनें लोपतो परंतु ॥ ७६ ॥

॥ श्लोक ॥

आहे नभीं सौख्यद तेजराशी ॥

दावीतसे मार्ग निजप्रकाशीं ॥
तो वृक्षपत्रीं जरि लोपताहे ॥
चंद्रानना सन्निध हेच आहे ॥ ७७ ॥
ठायीं ठायीं चंद्रिका अंथरीली ॥
पुष्पांची ही शुभ्र शय्याच केली ॥
वारा वाहे मंदसा शांति सारी ॥
श्रांतस्वांता होतसे तोषकारी ॥ ७८ ॥

॥ दिंडी ॥

असे सन्निध येतात जों गृहाचे ॥
धाम पाही पांथस्थ सुंदरीचे ॥
पर्णकाष्ठें छायेस मात्र थारे ॥
तशा भिंती साहित्य स्वल्प सारें ॥ ७९ ॥
क्षेत्र आंतिल बहु थोर नसे कांहीं ॥
स्पष्ट सांगे एकांत वास हा ही ॥
गृहस्वामिणि होओनि पुढें वेगें ॥

आंत याजी अतिथीस असें सांगे ॥ ८० ॥
अपरिचितसा पांथस्थ जाय गेहीं ॥
नेत्र लावुनि जों भुवन सर्व पाही ॥
चित्त दचके बहु नवल मनीं खोंचे ॥
वीरपुरुषाचें धाम असें साचें ॥ ८१ ॥
व्याघ्रशार्दुल मृग शशकचर्मभारे ॥
रीस जंबुक वृक अंथरिले सारे ॥
खड्ग खंजिर तरवार तिरकमाणा ॥
ढाल भाला बंदूक निजत्राणा ॥ ८२ ॥
परी तेथें आश्चर्य तया भारी ॥
स्तब्ध राहे रोखोनि दृष्टि सारी ॥
काय कोठिल गुजगोष्ट आठवीली ॥
पूर्व परिचितशी मानसीं उदेली ॥ ८३ ॥
दोन तेथें जीं पाहिलीं निशाणें ॥
लिखित वरुती संज्ञीक याप्रमाणें ॥

'मालपुरचा ठाकूर बादशाही ' ॥
दुजा वरुती ' जयपूरजयसवाई ' ॥ ८४ ॥
होय मानस उद्विग्न देखतां हें ॥
उभा कोठें हें कोण काय आहे ॥
देहभाना विसरोनि स्तब्ध ठेला ॥
व्यर्थ शोधोनी श्रमवि कल्पनेला ॥ ८५ ॥
काय आठवलें पाहि तया साक्षी ॥
कुरंगीतें सापेक्ष तो निरीक्षी ॥
पुन्हां दाटे संकोच मनीं वाया ॥
गोष्टअंतारिंची कीं तिला पुसाया ॥ ८६ ॥

॥ साकी ॥

या पुरुषाची चर्या ऐशी देखुनि नवल तिलाही ॥
निर्भय होउन वदन तयाचें उत्सुकतेनें पाही ॥८७॥

॥ दिंडी ॥

सभ्य रीती मुख शांत शस्त्रधारी ॥

शौर्य आंगीं वागोनि नम्र भारी ॥
तिला भासे पद उंच या प्रभावा ॥
योग्य ऐसा तर कोण हा असावा ॥ ८८ ॥
चंद्रवदना सत्प्रीतिचीच खाणी ॥
वदे पांथस्था काय मधुरवाणी ॥
"काय तें हो आश्चर्य काय येथें ॥
"काय पाहतसा नवल कोणतें तें ॥ ८९ ॥
"स्वस्थ आधीं बैसोनि घ्या विसावा ॥
"चर्म अंथरिलें अल्प असे सेवा ॥
"कृपाकरुनी परि एक मला सांगा ॥
"कोण आपण कोठील महाभागा" ॥९०॥
वयें तेही बहु अल्प कोमलांगी ॥
वर्ष चौदावें वागतसे अंगीं ॥
परी इतुकें चातुर्य बोलण्याचें ॥
थोर वाटे आश्चर्य मना साचें ॥ ९१ ॥

वदन सस्मित पाहोनि तिला दृष्टीं ॥
प्रीति उपजे आनंद भरे पोटीं ॥
स्वस्थ निजनेत्रें प्राशुनी सुधेला ॥
वदे उत्तर पांथस्थ सुंदरीला ॥ १२ ॥
"प्रिये बाले सौजन्य तुझें भारी ॥
"तुला कथितों तरि गोष्ट ऐक सारी ॥
"तुला ठावें जयपूर कीं सुजाणे ॥
"भूप तेथिल जयसेन महाराणे ॥ १३ ॥
"तया पदरीं मी करुनि असें सेवा ॥
"राजसहवासें सौख्य नित्य जीवा ॥
"सदा परहितव्यवसाय या चिदंगीं ॥
"विजय मजला ह्मणतात गे शुभांगी ॥१४॥
"परी पुसलें त्वां नवल कोणतें तें ॥
"सांग पुसतों तरि सर्व चरित्रातें ॥
"पिता कोठिल तव कोण तुह्मीं आहां ॥

"काय ह्मणुनी एकांत सेवितां हा ॥ १५॥
"सर्व चिन्हें एथील भासताती ॥
"शौर्य कीर्ति प्रत्यक्ष उभ्या मूर्ती ॥
"तेज ऐसें विपिनांत तरी वाया ॥
"गुप्त कारण तें काय लोपवाया" ॥ १६ ॥
होय ऐसें हें विजय पूसतांची ॥
स्थिती कैशी विपरीत कुमारीची ॥
पूर्व गोष्टीच्या आठवणें चित्तीं ॥
खेद गहिंवर तत्काळ लोटताती ॥ १७ ॥
दाखवाया गृहवस्तु परजनांतें ॥
साहजिक जें औत्सुक्य मनीं होतें ॥
सर्व विलया जावोनि दुःखसिंधु ॥
उचंबळला स्त्रवताति बाष्पबिंदु ॥ १८ ॥
कंप किंचित अधरास दुःखचर्या ॥
नसे आवर मोहास दुर्निवार्या ॥

वस्त्र वदना लावोनि शांत दृष्टी ॥
दुःख लपवाया व्यर्थ होय कष्टी ॥ ९९ ॥
अशीं दुःखें अवचीत सुंदरीचीं ॥
विजयसेनें अवलोकियलीं साचीं ॥
मनीं कळवळ चांचल्य नेत्रपद्मीं ॥
दयाकुसुमें विकसोनि हृदयसद्मीं ॥ १०० ॥
उठूं पाहे परतोनि शांत होई ॥
अंग सरसावुनि तोल पुढें देई ॥
गमे तिजला हृदयास दृढ धराया ॥
दुःख अबलेचें स्वोदरांत घ्याया ॥ १०१ ॥
"काय बाले तुज काय दुःख झालें ॥
"काय दुखवीलें हृदय कठिण बोलें ॥
"काय तुजला प्रिय आज आठवीलें ॥
"काय अथवा भय मानसीं उदेलें ॥१०२॥
"तुला कथिली मम गोष्ट मात्र आतां ॥

" तुझ्या पुसलें कीं ह्मणति काय ताता ॥
" जरी कारण दुःखास तुझ्या हें ही ॥
" गोष्ट विपरीत हि गुप्त असे कांहीं ॥१०३॥
" तुझ्या गाहिंवर अवचीत भरे चित्तीं ॥
" काय तुमची मग ऐशि ती विपत्ती ॥
" तरी वद वद वद गोष्ट तुझी सारी ॥
" शक्य असल्या होईन सहाकारी"॥१०४॥
वदे-"धिग्दैवा हाय महा ताता ॥
" काय वैभव तें काय गती आतां॥
" कसे नशिबा विपरीत तुझे ताळे ॥
"सर्व आठवतां चित्त हाय पोळे ॥ १०५ ॥
"काय जयपुर तें काय हा प्रसंग ॥
"नृपद्रोह्यांशीं व्यर्थ खरा संग ॥
"काय भावी परिणाम तो कळेना ॥
"तुझें ताता हें दैव देवसेना ॥ १०६ ॥

"तुह्मीं वदलां जयपूरचे अहों कीं ॥
"कसा ठावा मत्तात नसे शंकीं ॥
"कालगति जो जाणोनि दूर गेला ॥
"नसे स्मरणीं ही ठाव कसा त्याला॥१०७॥
"देवसेनाचें नांव जयपुराला ॥
"पुरून उरलें हें ठाउकें जगाला ॥
"राजभक्तीनें सुदृढ चित्त ज्याचें ॥
"हाय दुःखा परि तेंच काज साचें ॥१०८॥
"मालपुरचा ठाकूर नृपद्रोही ॥
"नृपाज्ञेनें कीं त्यास जिंकितां ही ॥
"अम्ही स्वामीचा बोल मान्य केला ॥
"हाच दैवा अपराध काय झाला ॥१०९॥
"अहा सदया जयसेन महाराजा ॥
"देवसेनावरि कोप काय काजा ॥
"उपेक्षा कां करितोस हे कृपाळा ॥

"कसा अमुचा अव्हेर असा केला ॥११०॥
"ह्वारकेशा सर्वज्ञ सत्य सांगे ॥
"भाव अमुच्या चित्तांत कसा वागे ॥
"सदा प्रेमें मत्तात मनीं आर्ती ॥
"कधीं डोळां पाहीन राजमूर्ती ॥ १११ ॥
"रायचित्तीं हा व्यर्थ कोप तापे ॥
"व्यर्थ दूषविलें ह्रदयही विकल्पें ॥
"शौर्य कीर्ती जरि विपुल मत्पित्याची ॥
"कशी स्वामीला भीति सेवकाची ॥११२॥
"कसा रायाचा कोप या भयांनीं ॥
"प्राप्त झाला कीं वास वनीं रानीं ॥
"तीन वरुषें ही भोगितों विपत्ती ॥
"किती आठवुं ती कष्टदशा चित्तीं ॥११३॥
"दैव कैसें विपरीत हा कपाळा ॥
"नृपद्रोह्यांशीं संग अह्मीं केला ॥

"दुष्ट कपटी ते मैर दुराचारी ॥
"स्नेह दाखवुनी छळिति अह्मा भारी ॥११४॥
"विजयसेना जयपूरचीं सुवृत्तें ॥
"अर्धी कळवा तीं प्रीय स्वस्थ चित्तें ॥
"जरी अंतरली ती सुजन्मभूमी ॥
"ह्रदय सद्गद होईल तया नामीं ॥ ११५॥
"कुठें अमुचा जयसेन महाराणा ॥
"नाम ज्याचें आधार असे प्राणा ॥
"तयांचीं तीं पाहातसा निशाणें ॥
"सौख्य तैसें आह्माशि दुःख जेणें ॥११६॥
"एक दावित मत्तात भावभक्ति ॥
"दुजें तैसें तत्कीर्तिशौर्य शक्ति ॥
"मालपुरचा ध्वज काय देखियेला ॥
"प्राप्त झाला समरांत मत्पित्याला" ॥११७॥
असें भाषण सप्रेम मनोभावें ॥

करूनि रमणी क्षण एक ती विसावे ॥
स्वजनवार्ता निष्कपटशा मनाला ॥
सदा वाटे उल्हास कथायाला ॥ ११८ ॥
वदन सुंदर सानंद शुभ्र इंदु ॥
सौख्य निर्भर गळताति प्रेम बिंदु ॥
मुक्त अवयव स्वच्छंद उभी राहे ॥
प्रीति उत्सुकता हर्ष दीसताहे ॥ ११९ ॥
अशा रूपा पांथस्थ तदा पाहे ॥
दृष्टिदृष्टीचें ऐक्य होत आहे ॥
तिच्या गोष्टींतें परिसतां प्रसंगीं ॥
खवळताती बहु भाव अंतरंगीं ॥ १२० ॥
पूर्वपरिचित किति गोष्टि मनीं येती ॥
होय तेणें अतिशयित दुःख चित्तीं ॥
हृदय कळवळलें ताप वृथा होई ॥
" व्यर्थ " ऐसा हळुं शब्द निघों पाही १२१॥

उभा राहे अस्वस्थचित्त होई ॥
तिच्या जवळीं जावोनि उभा राही ॥
पुन्हा निरखुनि सप्रेम सुंदरीतें ॥
वदे दुःखित होऊन काय तीतें ॥ १२२ ॥
"सखे बाले सुकुमार दैवसेने ॥
"तुझा कैसे हे क्लेश दुर्दशेनें ॥
"नको बोलूं तंव गोष्ट ठाउकी ती ॥
"कशीं निजकृत्यें सुजन नाठवीती ॥ १२३ ॥
"असो विघटित गतगोष्टि त्या न होती ॥
"तसा नलगे पाल्हाळ पाटवोक्ती ॥
"तुला वदलों होईन सहाकारी ॥
"तरी पुरविन तें वचन सत्प्रकारीं ॥ १२४ ॥
"तुला ठावें सन्निहित या स्थलाला ॥
"महाराणा जयसेन तोचि आला ॥
"नृपद्रोही दुःशील मैर दुष्ट ॥

" तया तच्छस्त्रीं भोगविले कष्ट ॥ १२५ ॥
"तुझी वार्ता नेशील तया कानीं ॥
"कष्टमोचन होईल सत्य मानीं ॥
"त्वरित अविलंबें तेथवरी जाणें ॥
"असे सन्निधही भूपतिचें ठाणें" ॥१२६॥
असें ऐकुनि चपलाक्षि तया काळीं ॥
चकित घाबरली म्लानमुखी झाली ॥
वृत्ति चंचल करुं काय होय ऐशी ॥
दीन वदनें प्रार्थीत ते तयाशी ॥ १२७ ॥
"अहो बाई होईल कसें आतां ॥
"तात माझा हे धांव उमाकांता ॥
"तुह्मी तरि जा सुदयाल विजयराया ॥
"तात माझा प्रियतात वांचवाया ॥ १२८ ॥
"सुप्रभातीं मृगयेस वना गेला ॥
"कसा नाहीं अद्यापि गृहा आला ॥

"त्यास कांहीं विपरीत सत्य मानीं ॥
"नेणुं नेलें कीं राजसेवकांनीं" ॥ १२९ ॥
—"भीरु बाले तुज व्यर्थ भीति पाहीं ॥
"कसा तुजला विश्वास असा नाहीं ॥
"जरी नेलें नृपसेवकीं तयाला ॥
"असे ठावा त्वत्तात त्या नृपाला ॥ १३० ॥
"कठिणत्हृदये कां मानिशी नृपातें ॥
"क्रूर कपटी उद्युक्त विनाशातें ॥
"नको शंका त्हृदयांत अशी कांहीं ॥
"त्वरित जाऊनी तूंच तया पाहीं" ॥ १३१ ॥
—"पुरुष निष्ठुर बहु धीट विचाराचे ॥
"कसें कळणें सामर्थ्य तें स्त्रियांचें ॥
"भीरु अबला अंजाण अज्ञी पंगू ।
"मान लज्जा कुलिनत्व हीं न भंगूं ॥ १३२ ॥
"नसे परिचय परिपाठ कुठें जाणें ॥

"भेट देतिल मजलागि कसे राणे ॥
"धीट चालकता समय साधण्याची ॥
"स्त्रीस्वभावा कोठून असायाची ॥ १३३ ॥
"व्यर्थ जन्मुनि मी व्यर्थ हें स्त्रियांचें ॥
"जिणें धिग् दैवा काय करायाचें ॥
"जरी असता मज्जन्म पुरुषदेहीं ॥
"दशा ऐशी कां तात भोगिता ही"॥ १३४॥

॥ साकी ॥

परिसुनि ऐशा उद्गारातें द्रवलें हृदय प्रेमें ॥
वीरश्रीनें विलसित रमणी पाहुनि नेत्र विरामे १३५
तरूणी सुंदर देहिं तियेच्या अभिनव तेज विराजे॥
तेणेंयुवपुरुषाच्याहृदया मोहित कसें न कीजे १३६
ऐशा रूपांबुधींत तेव्हां पोहुनि नयन निवाले ॥
चित्तींप्रसवेदयाप्रियेलासुखकरवचनें बोले॥ १३७॥
"सुंदर बाले अविचारानें धीर न सोडिं कदापी॥

“निजजीवित्वानिष्ठुरतेनेंदोषुंनकोसंतापीं॥ १३८॥
“एकाकी तुज शंका वाटे जाया राजगृहा ही॥
“ह्मणशिलतरिमीयेइनसंगेंअंतरिंविचारपाहीं १३९
“मी जर परजन तुजसंगातीं लौकिक वदेल काय॥
“अत्युत्कंठाधरूनीनघडोसुविचारासअपाय १४०
“जाय तरी तूं तेथवरी मग आहें साह्य तुला मी॥
“सज्जनवचनाभंगिलकैसेंगुंतविलेंचलगामीं ४१
“आतां देई आज्ञा उदइक जाया निजधामातें॥
“येशिलसत्वरजाणुनिराहिनासिद्धतुझ्याकामातें ४२

॥ दिंडी ॥

“असो तुजलाही रात्र होत आहे॥
“आज श्रमली असशील वाटताहे॥
“वनीं झाले श्रम फार आज जीवा॥
“तरी मजलाही पाहिजे विसांवा॥ १४३॥
“स्वस्थचित्तें विश्रांति जाय घेई॥

"त्वरें उदइक लक्षोनि मार्ग जाईं ॥
"परी राहूंदे स्नेह कृपाबुद्धि ॥
"तुझी होवो ते सकल कार्यसिद्धि"॥१४४॥

॥ श्लोक ॥

अहा निद्रा जी कां श्रम शमविणारी प्रियसखी॥
जिच्यासंगें आत्मा अभिनव विलासास निरखी ॥
जिची तन्द्री चित्ता अखिलजडचिंता विसरवी ॥
निजानंदीं तेणेंमन विमल सौख्यीं विहरवी॥१४५॥

---

॥ श्लोक ॥

जयीं श्री रक्तांगा उदय गिरितें शोभवितसे ॥
सरे मार्गें मार्गें जडरजनि थारा तिज नसे ॥
नभीं सारे तारे लपति पिवळा इंदु नटला ॥
जगीं तेंव्हांनित्यक्रमचरणघोषप्रकटला ॥ १४६॥

॥ दिंडी ॥

शांत शीतल गंभीर सुप्रभातीं ॥
दिसे वैभव नवरम्य वनप्रांतीं ॥
स्तब्ध निश्चल जीवित्व रेखियेलें ॥
असें भूपृष्ठीं वस्त्र अंथरीलें ॥ १४७ ॥
कोठकोठें तरु उंच नभीं गेले ॥
धूम्रपटलें ते अर्ध वेष्टियेले ॥
दूर पाहूं तरि धुंद अंधकार ॥
मंदगतिनें गळताति जळतुषार ॥ १४८ ॥
वृक्षतृणपत्रीं उदक सिंचियेलें ॥
शुभ्र मौक्तिकसे बिंदु सांडियेले ॥
विगत यामिनि पाहून स्त्रैण इंदु ॥
प्रियाविरहें कीं टाकि बाष्पबिंदु ॥ १४९ ॥
जलें सिंचित बहुरंग पुष्पपत्रें ॥
नसति तापें अद्यापि विकल गात्रें ॥

ताठ त्यांचीं टवटवित कोमलांगें ॥
अशा सौंदर्यें सौख्य पूर्ण रंगे ॥ १५० ॥
विरल धुकटीं बहु दृष्टिआड येती ॥
चहूंकडचे तीं मार्ग लोपवीती ॥
गंधभारें जडवायु शांत ठेला ॥
लुब्ध करितो पांथस्थ इंद्रियांला ॥ १५१ ॥
भीत शंकित मन मार्ग सांपडाया ॥
वस्त्र पांघुरली शीत निवाराया ॥
पथीं वारित सुस्नातवृक्ष हातें ॥
अशी मार्गानें जाय सुंदरी ते ॥ १५२ ॥
कठिण वाटें ती सावकाश जाई ॥
तृणावरचें जल शिंतडतें पायीं ॥
नेत्र रिझती जरि दृष्टपदार्थांनीं ॥
चित्त रोधियलें अन्य विचारांनीं ॥ १५३ ॥
मनीं आणी गतगोष्टिचा पसारा ॥

सत्य आहे कीं भास असे सारा ॥
परी स्वप्नहि तें सर्वथैव नोहे ॥
स्पष्ट ऐसें निजहृदय सांगताहे ॥ १५४ ॥
सौख्य संशय हे स्वैर अंतरंगीं ॥
करिति क्रीडेतें कल्पनातरंगीं ॥
काय विजयाची गोष्ट खरी ती कीं ॥
नसे ठकवण चित्तांत असें शंकी ॥ १५५॥
विजयसेनाचें स्मरण होय जेव्हां ॥
उचंबळला हृदयाब्धि तिचा तेव्हां ॥
वदन सस्मित संकोच धरी जैशी ॥
काय लाजतसे तीच आपणाशीं ॥ १५६ ॥
न परसन्निध एकांत असें पाही ॥
वदे स्वमनाशीं काय लज्जिता ही ॥
“अहा लटकें विजयास कसें मानूं ॥
“काय मलिनत्वा वरिल देव भानू ॥ १५७ ॥

"रूपयौवन सुभगांग दैवशाली ॥
"शांत आनंदें वृत्ति रंगलेली ॥
"शील उत्तम सौजन्य दया माया ॥
"वसंति सद्भावें करुनि तया ठायां ॥१५८॥
"रूप सद्गुण तीं आचरणें सारीं ॥
"कशीं त्याचीं मज आवडतीं भारी ॥
"विनाकारण मजवरति करी माया ॥
"नये त्याचे उपकारही स्मराया ॥ १५९ ॥
"तया त्रासविलें काय स्वाभिमानें ॥
"मींच अपुल्या निष्ठूर वर्त्तनानें ॥
"कसें स्वहितास्तव कष्टविलें त्याला ॥
"मींच अपुली सांगोनि दुःखमाला ॥१६०॥
"तयाठायीं मच्चित्त सर्व साचें ॥
"परी कळतें मज तें कसें तयाचें" ।
असें ह्मणुनी लज्जीत उभी राहे ॥

कुसुमवल्लीतें स्तब्ध पाहताहे ॥ १६१ ॥
बाल्य वदनींचें जाय त्या प्रसंगीं ॥
स्त्रीत्व संकोचित काठिण येत अंगीं ॥
गोड कौतुक त्या मुग्ध अवस्थेचें ॥
बाल्य जेव्हां स्त्रीत्वांत विरे साचें ॥ १६२ ॥
वदन सस्मित मन मग्न निजानंदीं ॥
सौख्य भावित चित्तांत पूर्ण छंदीं ॥
सावकाशें तोडीत फुलें हातें ॥
जणूं गुंफाया हार हृदिस्थातें ॥ १६३ ॥
मार्ग पुढती लक्षूनि तशी चाले ॥
वृक्षपत्रावरि पवन मंद हाले ॥
बालकिरणांनीं शोभविलीं रानें ॥
पूर्व दिग्वधुचा निटिलतिलकयानें ॥ १६४ ॥
शुभ्र उदकें पर्णांत सांचलेलीं ॥
एकवटुनी गळतात बिंदु खालीं ॥

करिल भास्कर हा विकल मृदुल गात्रें ॥
ह्मणुनि रोदन कीं करिति वृक्षपत्रें ॥ १६५ ॥
मनीं संभ्रम लगबगित चालताहे ॥
काननाची विश्रामदेवता हे ॥
तिचें लोलांशुक चपलगती हाले ॥
अशी पुढती लक्षूनि मार्ग चाले॥ १६६॥

॥ साकी ॥

सानंदांतःकरणें चाले निर्भय त्या मार्गानें ॥
अवचितसंकटदेखुनिदचकेकोमलह्रदयभयानें ६७

॥ दिंडी. ॥

स्थूल भीषण विक्राळ वर्ण काळा ॥
प्रेत अश्वाचें देखियेलें डोळा ॥
शाम अंगीं शृंगार सुवर्णाचा ॥
साज पृष्ठींही भरजरी पटांचा ॥ १६८ ॥
प्रेत अवचित मार्गांत असें पाहे ॥

बालत्हृदयीं भीरुत्व कांपताहे ॥
परमउत्साहें हेतु मनीं होते ॥
हाच मध्यें अपशकुन कीं तयांतें ॥ १६९ ॥
कोण भूपतिचा अश्व दैवहीना ॥
युद्धकर्मांचा योगही दिसेना ॥
कसा कोठुनि येथेंच टाकिला कां ॥
मनीं विजयाची ये न परी शंका ॥ १७० ॥
कसें सुपथीं दुश्चिन्ह अहा देवा ॥
काय भाग्याचा पुढति असे ठेवा ॥
परत जावें चित्तांत असें आणी ॥
तोंच वाटे कीं बोलतसे कोणी ॥ १७१ ॥
पुढें मार्गीं त्या देखिले शिपाई ॥
जयां अंगीं औद्धत्य दांडगाई ॥
वदति बोली यवनीच नीच नेटें ॥
जसे बावरले येति आडवाटें ॥ १७२ ॥

घोर रानीं ही एकली कुरंगी ॥
नसे सन्निधही कोण या प्रसंगीं ॥
चित्त आधीं भयभीत जाहलें ही ॥
तोंच तेथें यममूर्ति अशा पाही ॥ १७३ ॥

॥ साकी ॥

स्वस्थानातें भूप न येतां विपरित गति कीं त्यातें॥
चिंतातुर हे सेवकह्मणुनी धांवति शोधायातें १७४

॥ श्लोक ॥

राजाचा नकळेच शोध ह्मणुनी रानें वनें हिंडती॥
चिन्हें पारखितीकळे न गतिही कैशी तयाचीस्थिती
दुःखांत श्रमले निराश ठरले तों या स्थला पातले ॥
अश्वाचेंशवदेखिलेंदचकले भ्याले उभे राहिले७५

॥ साकी ॥

भूपतिचा हा अश्व असें हें कळलें त्या दूतांतें ॥
दुश्चिन्हें हीं पाहुनि ऐशीं करिती बहुदुःखातें १७६

॥ श्लोक ॥

ते सुंदरी जवळि पाहुनि धांवती ते ॥
येती समीप परिवेष्टिति बापुडीतें ॥
कांपे तिचें हृदय चित्त नसे ठिकाणीं ॥
झाल्या मृगापरिच पाहत साह्य कोणी १७७

॥ दिंडी ॥

व्याघ्र जैसे पाहूनि वनीं गाय ॥
वेष्टिती कीं तिज कल्पुनी अपाय ॥
असे निष्ठुर पाहूनि कोमलांगी ॥
पडे मूर्च्छित तत्काल भूमिभागीं ॥१७८ ॥

॥ श्लोक ॥

अत्युग्र हे पुरुष पाहुनि भीरु बाला ॥
चित्तीं भयें दडपली स्मृतिभंग झाला ॥
आकंपितावयव होउनि चंडवातें ॥
मूर्च्छायमान पडली जितकर्दली ते ॥१७९॥

॥ साकी ॥

ऐशा काळीं अद्भुत करणी जगदीशाची साची ॥
संकटसमयीं रक्षणशक्ति नपडे उणी जयाची १८०
धांवत धांवत अश्व लांबुनी चपलगती येताहे ॥
सुंदर उत्सुक दयाशीलशा पृष्ठीं पुरुषा वाहे १८१ ॥
कुसुमगर्भवत कोमळतनु जी निष्ठुर योग तशीला॥
पाहतांचतद्धैर्यगिरीतोहिमचंयसाविरघळला १८२॥
अश्वावरूनीलगबगउतरेदुःखितबहुतचिझाला ॥
विपरितकैशीक्रूरदशाहीअभयदिलेंकींजीला १८३

॥ दिंडी ॥

तिच्या जवळीं तो जाय उभा राहे ॥
भूमिभागीं तन्निकट बसूं पाहे ॥
दूत शोधार्थी तेथ पातलेले ॥
करें वारोनी दूर घालवीले ॥ १८४ ॥

॥ श्लोक ॥

उचलुनि निजअंकीं सांवरी सुंदरीतें ॥
श्रम मग निववाया हालवी पल्लवातें ॥
फिरवि बहुतवेळां हस्त तीच्या कपाळीं ॥
हळहळ हृदयीं कीं बापुडी गांजियेली॥१८५॥
मुखातें म्लानातें दृढनयन लावोनि निरखी ॥
मनस्थानीं प्रेमें भरित ठसवी हे प्रियसखी ॥
न जाणों हें रूप प्रतिकृति मनांतील दिसतें॥
स्वचित्तींकिंवाहेप्रियसगुणमूर्तिप्रकटते॥१८६
अशी मूर्ति प्रेमा धरुनि निरखी जों क्षणभरी॥
विलुब्ध स्वांताचाप्रणय जडला त्या तनुवरी॥
सुशीला सौजन्यें गुणवति अलौकीक दिसली
स्वरूपेंलावण्याअनुपममनींपूर्णठसली॥१८७

॥ दिंडी ॥

तिचे आठवितो सुगुण मनामाजी ॥

२०९६

चित्त ज्याचें आधींच तिला राजी ॥
मनीं चिंता हे प्राप्त कशी होते ॥
कसें गवसावें चित्त हिचें मातें ॥ १८८ ॥
स्थिती विपरित परि निकट राजभक्ति ॥
कठिणसमयीं धारिष्ट जिची शक्ति ॥
मलिनसंगति परि निर्मला सुशीला ॥
प्रौढ बुद्धी ही अल्पशा वयाला ॥ १८९ ॥
अलौकिक हे गुण नवल बहू पाहे ॥
रूप सुंदर ही चित्त वेधिताहे ॥
गमे ऐशी ही सुगुणरत्नमाला ॥
योग्य अत्युच्चस्थानभागिनीला ॥ १९० ॥

॥ साकी ॥

इतुक्यामाजीं अवचित नेत्रें मुग्धेच्या हातींचा ॥
अर्धगुंफलेला तो पाही सुंदर हार फुलांचा॥१९१
स्वकरामाजीं त्या हारातें आनंदितसा घेई ॥

सुगंध भावुनि चित्त प्रेमें भरूनी प्रसन्न होई॥ १९२
दुःखित उत्कंठितसा होउनि म्लानमुखी युवतीचे॥
त्या पुष्पांनीं नेत्र स्पर्शी प्रियकर कृत्य दयेचें॥ १९३

॥ श्लोक ॥

नेत्रां स्पर्शसुशीतळागुनितिलाआरामकांहींगमे॥
होई सावध शांत सर्व बघतां चित्तांत भीती शमे॥
डोळे जों उघडोनि पाहत तदा त्यातें पुन्हा देखिलें
कीं ज्यातें हृदयासनींबसवुनीप्रेमाभरें पूजिलें॥ १९४

न स्वप्न हें वदवतें न जरी तथापी ॥
प्रत्यक्ष जें दिसत भास न तो कदापी ॥
पाही पुन्हा परिचया दृढता मिळाली ॥
झांकोनियां नयन साध्वसचित्त झाली॥ १९५॥
असा जाणुनी भाव तीच्या मनींचा ॥
वदे काय तो हंस मोहद्रुमींचा ॥
“उठें सुंदरी सोड ही भीति वाया ॥

"त्वरें आपुला मित्र संतोषवाया ॥ ११६ ॥

॥ साकी ॥

"तुजसाठीं हा दुःखित माझा जीव बहू झालासे॥
"मार्गामध्यें तुजला संकट ओढवलें हें कैसें ११७
"प्रातःकाळीं उठूनि गेलों सत्वर राजगृहाला ॥
"विलंबपाहुनतेथुनआलोंपरतुनतुजन्यायाला ९८

॥ दिंडी ॥

"तुझ्यासद्वचनें गुंतविलें कामीं ॥
"तुला एकाकी त्यजिन तो कसा मी ॥
"तुला वदलों होईन सहाकारी ॥
"तरी पुरविन तें वचन सत्प्रकारीं ॥११९ ॥
"तुझे वदनीं संकोच भीति पाहे ॥
"कशी लज्जा सानंद शोभताहे ॥
"तुझे अंतरिंचा भाव जाणतों मी ॥
"सर्व हेतू पुरवील तुझा स्वामी ॥ २०० ॥

॥ साकी ॥

"एकाकी तुज टाकुन आतां जाइन मीन कदापी॥
"नगरासन्निंधसंगेंनेतोंयुक्तिदिसे हे सोपी"॥२०१॥
ऐसें वदुनी अश्वावरतें उचलित तिजला हातीं ॥
परपुरुषाची भीति तथापी पुनरपि उपजे चित्तीं २॥

॥ श्लोक ॥

अश्वावरी जवळ सुंदर कामिनीला ॥
घेऊनि रक्षक तिचा वहिलें निघाला ॥
त्याचे मनीं अतुल उत्तमा हर्ष नाचे ॥
सांनिध्यसौख्यामिळतांप्रियअंगनेचें ॥ २०३ ॥
वाजीपृष्ठिं बसे असेहि जवळीराजी जयाची सखी॥
जी जीवाधिकमानिलीह्मणुनिती लाजीरवाणीमुखीं
राजीवाक्ष तिचे विलोकुनि मनामाजीं झुरे सुभ्रमें॥
आजीहामजधन्यलाभगमलामोजीमनीं संभ्रमें४॥

॥ दिंडी ॥

असे नगराचे जवळ पातले ते ॥
विजय खालीं उतरीत सुंदरीतें ॥
ह्मणे आतां एथून जाय वेगीं ॥
राजमंदिरही तेंच पैलभागीं ॥ २०५ ॥

॥ श्लोक ॥

ऐशापरी सुनयना समजावुनी ते ॥
चाले पुढें निजमनोगत साधण्यातें ॥
दृष्टी ठरेन चपलाश्व निघोनि गेला ॥
ह्या एकली त्यजुनि सुंदर बापुडीला ॥२०६॥

॥ साकी ॥

मंद मंद पद उचलित चाले ग्लानमुखीसुकुमारी॥
दुःखितशंकितचित्तहिचेंकींपडलेंकायविचारीं ॥७
राजगृहाचे सन्निध येतां पाही रक्षक दारीं ॥
परंतु जाणुन अटक नसे हें प्रवेशली माझारीं ॥८॥

॥ श्लोक ॥

उभी राहे पाहे परिचित दिसे कोण न तिचें ॥
कुठें जावें कोणाजवळ पुसणें काय न सुचे ॥
परी चित्तीं धीरा धरि सुजनता तेहि वरुनी ॥
पुसूं पाहे तेथें जवळ असती त्या नृपजनीं २०९॥
तेधवां अतुल हर्ष सतीतें ॥
हास्ययुक्त बघतां विजयातें ॥
तो वदे "उशिर कां तुज झाला ॥
"चाल सत्वरित भूपसभेला ॥ २१०॥

॥ दिंडी ॥

"सभेमाजीं जयसेन महाराणे ॥
"असति आतां येथेंस तुला जाणें ॥
"नृपतिसन्मुख तरि सिद्ध होय जाया ॥
"तयापाशीं त्वत्प्रार्थना वदाया" ॥२११॥

॥ श्लोक ॥

"सदयविजयराया काय सांगा करूं तें ॥
"मज न नृपसभेला जाववे एकलीतें ॥
"कुशल असति किंवा तात कांहीं कळेना ॥
"भयभित मन होतें धैर्यही आकळेना॥ २ १ २॥
"तुह्मी झाला माझे सकळ परि ही रक्षक जसे
"ह्मणोनी स्वांताचे दृढतर तुह्माशीं भरवसे ॥
"उपेक्षा कांआतांकरूनि हि अनाथात्यजितसां
"दयाजैशी केलीसततपुरवा सत्क्रम तसा" १ ३
—"तुजवरी नृपती करितो दया ॥
"हृदयिं भीति तरी तुज कासया ॥
"मजवरी जडली परि त्वन्मती ॥
"तरि न सोडिन मी तव संगती" ॥ २ १ ४ ॥

॥ दिंडी ॥

अशा शब्दें संतोषवुनी तीतें ॥

बहु प्रेमें तिजलागिं धरी हातें ॥
कुरंगाक्षी सविलोल पुढें पाहे ॥
तयासंगें भयभीत चालताहे ॥ २१५ ॥

॥ श्लोक ॥

सभेमाजीं येती उभयजन हे त्याच समयीं ॥
मनें दोघांचींही अतिशयित उत्कंठित तयीं ॥
मृगाक्षीतें तेव्हां अभिनव चमत्कार दिसती ॥
न देखे भूपातें बहुतजनहीतेथनसती ॥ २१६ ॥

॥ साकी ॥

तेथें सिंहासनीं महानृप नसती ते कोठेंही ॥
चारपांचसरदारउभेहेंविस्मितहोउनिपाही॥ २१७॥
या समुदायींअपुलेंकवापरिचितआहेकोणी ॥
वाटेदेखायाहेंतीचेंनव्हतेंचित्तठिकाणीं ॥ २१८ ॥

॥ श्लोक ॥

सिंहासनाजवळ पाहत येत ऐसें ॥

तेथील सर्व जन होति पलीकडेसे ॥
सन्मान्यशील विनयें नत सर्व होती॥
हें देखतां नवल विस्मित फार चित्तीं॥२१९॥
सिंहासना सन्निध शीघ्र आला ॥
घेवोनि संगें शरणागतेला ॥
सोडी तिचा हस्त अशा प्रसंगीं ॥
आश्चर्य मोठें बघते कुरंगी ॥ २२० ॥

॥ श्लोक ॥

जो गेहीं असतांनजाणुनतदाअत्यादरेंपूजिला ॥
जोचित्तारुचलाप्रकामह्मणुनीप्रेमांबुनेंक्षाळिला ॥
जोप्रीतीकरिफारयास्तववनींत्राताअसामानिला ॥
तोआतांप्रियमित्ररक्षकतिनेंसिंहासनींदेखिला२२१

गजबाजित विलोकी दृष्टि जैशी तरंगे ॥
थरथरथर भेणें कांपलीं सर्व अंगें ॥
सहन न करवे हें थोर आश्चर्य दीना ॥

ह्मणुनि विकल होते देहही सांवरेना॥ २ २ २ ॥

॥ दिंडी ॥

भूमिभागीं पडणार कन्यका ही ॥
तोंच ऐसें जन वृद्ध एक पाही ॥
त्वरित धांवे तो पुरुष तया ठाया ॥
हात पसरी तिजलागिं सांवराया ॥ २ २ ३ ॥

॥ श्लोक ॥

कष्टें क्षीणवपू जरा विखरली मंदावले नेत्र ही ॥
अंगींचें जरिदिव्यतेजविटलें मानी दिसे निस्पृही॥
वृद्धत्वीं युवशौर्यही स्फुरतसे चित्तीं अहंता वसे ॥
शांतीवत्सलता निवास हृदयींऐशीमुखश्रीदिसे २ ४

॥ साकी ॥

ह्या पुरुषाचे अंगावरती पडली असतां श्रांत ॥
कन्या ही जों त्यातें पाही देखे अपुला तात२ २ ५

॥ दिंडी ॥

देवसेनातें ओळखितां कन्या ॥
गळा घाली ती घट्ट मिठी धन्या ॥
रडे स्फुंदस्फुंदोनि अश्रु ढाळी ॥
तात गहिंवरला तोहि तया काळीं ॥२२६॥

॥ साकी ॥

परोपरीच्या उद्गारांचा संचय हृदयीं दाटे ॥
नाटोपुनि तो भंगुनि सीमा वाहे नयनांवाटें॥२२७

॥ श्लोक ॥

सदयभूप हा प्रेम पाहतां ॥
गहिंवरे तदा दुःख दाटतां ॥
जवळ पातला सद्गदीतसा ॥
वदत त्याप्रती कौतुकें जसा ॥ २२८ ॥

॥ दिंडी ॥

'प्रिये बाले हें काय असें झालें ॥

"तुला विस्मित मीं फार कसें केलें ॥
"क्षमा माझा अपराध कराया मीं ॥
"तुझा गुणवंते याचितसें स्वामी ॥ २२९ ॥
"जयावरती उपकार तुवां केले ॥
"जया सद्वचनें साह्य याचियेलें ॥
"विजय होता जो सिद्ध तुझ्या काजा ॥
"तोच पाही जयसेन तुझा राजा ॥ २३० ॥

॥ श्लोक ॥

"भला आजिचा लाभ हा देवसेना ॥
"तुह्मा सारिखा मित्र आह्मां असेना ॥
"तरी आठवूं खेदकारी न कृत्यें ॥
"न भंगोच सौहार्द हें वैपरीत्यें ॥ २३१ ॥

॥ साकी ॥

"परिसा आतांकायअधोमुखहोउनतुमचीकन्या ॥
"लज्जितऐशीप्रार्थितसेतरकरणेंतिजलाधन्या ३२

"तुला विस्मित मीं फार कसें केलें ॥
"क्षमा माझा अपराध कराया मीं ॥
"तुझा गुणवंते याचितसें स्वामी ॥ २२९ ॥
"जयावरती उपकार तुवां केले ॥
"जया सद्वचनें साह्य याचियेलें ॥
"विजय होता जो सिद्ध तुझ्या काजा ॥
"तोच पाही जयसेन तुझा राजा ॥ २३० ॥

॥ श्लोक ॥

"भला आजिचा लाभ हा देवसेना ॥
"तुह्मा सारिखा मित्र आह्मां असेना ॥
"तरी आठवूं खेदकारी न कृत्यें ॥
"न भंगोच सौहार्द हें वैपरीत्यें ॥ २३१ ॥

॥ साकी ॥

"परिसा आतांकायअधोमुखहोउनतुमचीकन्या ॥
"लज्जितऐशीप्रार्थितसेतरकरणेंतिजलाधन्या ३२

"तीच्या लज्जितवदनावदवेन तिचामानसमारा ॥
"जाणुनतरितोपुरवाकरुनीमजवरतीउपकारा' ३३

॥ श्लोक ॥

नृपाच्या बोलातें परिसुनि मृगाक्षी थरकली ॥
मुखीं लज्जा दाटेपरि दिसतसे कीं हरिखली
त्वरें खालीं पाही नववधुच ती लाजत असे॥
पितातेंव्हांतीतेंधरुनिहृदयाशींवदतसे ॥२३४॥
"झालोंमीबहुधन्यआजपुरल्याइच्छामदीयांतरीं ॥
"कृत्यें दुर्घट मानिलींसहजतीं झालींसुदैवेंखरीं ॥
"सद्भक्तिव्यसनींरतानसुफलप्राप्ती कधीं अंतरे ॥
"केलेंपूरितकामथोरदिधलासंतोषविश्वंभरें" २३५

समाप्त.

REFBK-0020169
REFBK-0020169
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. २०१६८
मुंबई शाखा (स्थायी प्रत)